आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत
विशेष बाबीच्या प्रस्तावासंदर्भात मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का. १४८२,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादामा कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ०१ जानेवारी, २०१८

वाचा :-

१) **नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का. १४८२, दि. १२/७/२०१६**
२) **नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दि. ३१/८/२०१७**

शासन परिपत्रक:-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विधानसभा / विधानपरिषद सदस्यांनी सुचविलेल्या कामास जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता देऊन निधी संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणेकडे सुपूर्द करण्यात येतो. तथापि काम विहित कालावधीत पूर्ण न झाल्याने निधी शासनास समर्पित केला जातो. दरम्यानच्या काळात विधानसभा / विधानपरिषद सदस्याचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने समर्पित निधीची मागणी जिल्हाधिकारी, यांच्याकडून शासनाकडे केली जात नाही. परिणामी अशी कामे दीर्घकाळ अपूर्ण राहतात किंवा काम पूर्ण झाल्यानंतर निधीची मागणी शासनाकडे केली जाते.

२. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दरवर्षी आवश्यक तेवढाच निधी अर्थसंकल्पीत केला जात असल्याने जादा निधी मंजूर करणे शासनास शक्य होत नाही. तथापि काम पूर्ण झाले असल्याने संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणेस देयक अदा करणे आवश्यक ठरते. अशा परिस्थितीत प्रथम अशी कामे वेळेत पूर्ण न होण्यास/ निधी खर्च न होण्यास तसेच निधीची मागणी शासनाकडे वेळीच न करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबादारी निश्चित करण्यात यावी. तसेच कार्यकाळ संपुष्टात आलेल्या विधानसभा/विधानपरिषद सदस्याने प्रस्तावित केलेले काम हे बांधकामाशी संबंधित असेल व त्यातून शासकीय मालमत्ता निर्माण होणार असेल आणि अशा अपूर्ण राहिलेल्या किंवा पूर्ण कामांकरिता सबंधित जिल्हातील विद्यमान विधानसभा/ विधानपरिषद सदस्य उर्वरित निधी देण्यास इच्छुक असतील तर त्यांच्या चालू आर्थिक वर्षाच्या निधीमधून विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देता येईल. सबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाचे स्थायी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

३. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत “विशेष बाब” म्हणून मंजूरी देण्यासंदर्भातील परिच्छेद क्र. ३.३९ नियोजन विभाग, शासन निर्णय क्र स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दि. ३१/८/२०१७ अन्वये मार्गदर्शक सूचना मध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयातील ब (II) नुसार सांस्कृतिक/साहित्यिक/ शैक्षणिक/क्रीडाविषयक/पर्यावरण/आरोग्य इ. विषयक बाबींना “ विशेष बाब” म्हणून मंजूरी देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार विशिष्ट कालावधीत आयोजित होणारे साहित्य संमेलने/क्रीडा स्पर्धा/ आरोग्य शिबिरे/महोत्सव इ. कार्यक्रमांसाठी निधी देण्यास “विशेष बाब” म्हणून मंजूरी देण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त होत असतात. अशा प्रस्तावांची छाननी करुन त्यावर उचित निर्णय घेण्यास शासनास पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक आहे. यास्तव असे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत “विशेष बाब” म्हणून मंजूर होऊ शकणारे परिपूर्ण माहितीसह प्रस्ताव शासनास सादर करतांना ते कार्यक्रमापूर्वी किमान १५ दिवस अगोदर शासनाकडे प्राप्त होतील याची

जिल्हाधिकारी यांनी खबरदारी घ्यावी. उशिरा प्राप्त होणारे प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, याची जिल्हाधिकारी यांनी कृपया नोंद घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०१०११७३३३४७३१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2018.01.01 17:38:21 +05'30'

(अ. द. जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
६. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
७. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१३. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१५. संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य मुंबई,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्ताची कार्यालये,
१८. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने).
२१. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२३. भारतीय जनता पाटी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२०,
२४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४),
२५. महाराष्ट्र कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी),महाराष्ट्र कमिटी,जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी,मुंबई-१३,

२६. इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
२७. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१,
२८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,
२९. निवडनस्ती, कार्यासन १४८२, नियोजन विभाग.